दि. ०६/०७/२०२६

# जाहीर आवाहन

## धोकादायक व अतिधोकादायक इमारती तसेच सर्व गृहनिर्माण संस्थांसाठी

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिक, गृहनिर्माण संस्था, इमारत मालक, भोगवटादार व रहिवाशांना कळविण्यात येते की, भारतीय हवामान विभागाने (IMD) रायगड जिल्ह्यासाठी दिनांक ०५ जुलै ते ०७ जुलै या दरम्यान "रेड अलर्ट" जारी केला असून अतिमुसळधार पाऊस, जोरदार वारे व स्थानिक पातळीवर अतिवृष्टी होण्याचा इशारा दिला आहे. अशा परिस्थितीत जुन्या तसेच संरचनात्मकदृष्ट्या कमकुवत इमारतींना धोका निर्माण होण्याची शक्यता वाढते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम २६४ अन्वये धोकादायक व अतिधोकादायक (C-1) म्हणून घोषित करण्यात आलेल्या इमारतींमधील सर्व रहिवाशांनी तात्काळ इमारत रिकामी करून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे व महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेल्या नोटिसा व सूचनांचे काटेकोर पालन करावे. याचबरोबर, पनवेल शहरात अलीकडील काळात धोकादायक म्हणून घोषित नसलेल्या काही इमारतींमध्येही छत/स्लॅब कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे इमारतीच्या वयाची पर्वा न करता सर्व सहकारी गृहनिर्माण संस्था, इमारत मालक व व्यवस्थापन यांनी पात्र संरचनात्मक अभियंत्याकडून दरवर्षी इमारतीचे संरचनात्मक लेखापरीक्षण (Structural Audit) करून घेणे तसेच अहवालानुसार आवश्यक दुरुस्ती, मजबुतीकरण व प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ करणे अत्यावश्यक आहे.

**धोकादायक इमारतीची प्रमुख लक्षणे :**

- बीम, स्लॅब, स्तंभ किंवा भिंतींना मोठे तडे जाणे.
- कॉंक्रीट निखळून लोखंडी सळया उघड्या दिसणे.
- स्तंभ, भिंती किंवा इमारत झुकलेली दिसणे.
- स्लॅब किंवा प्लास्टर मोठ्या प्रमाणात पडणे.
- इमारतीतून असामान्य आवाज येणे.
- पावसामुळे गळती होऊन संरचनात्मक नुकसान दिसून येणे.

**नागरिकांनी घ्यावयाची खबरदारी :**

- धोकादायक इमारतीत वास्तव्य करू नये.
- इमारतीमध्ये धोक्याची लक्षणे दिसल्यास तात्काळ तज्ञ संरचनात्मक अभियंत्याचा सल्ला घ्यावा.
- महानगरपालिकेच्या संबंधित विभागास माहिती द्यावी.
- आवश्यक असल्यास तात्काळ इमारत रिकामी करून सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

**महत्त्वाची सूचना**

धोकादायक इमारतींबाबत महानगरपालिकेने दिलेल्या आदेशांचे पालन न करणे, तसेच इमारतीचे संरचनात्मक लेखापरीक्षण (Structural Audit) न करणे किंवा अहवालानुसार आवश्यक दुरुस्ती न करणे यामुळे कोणतीही दुर्घटना, छत/स्लॅब कोसळणे, इमारतीचा काही भाग किंवा संपूर्ण इमारत कोसळणे, जीवितहानी अथवा वित्तहानी झाल्यास त्यास संबंधित इमारत मालक, विकासक, सहकारी गृहनिर्माण संस्था/सोसायटी, भोगवटादार व व्यवस्थापन पूर्णपणे जवाबदार राहील. अशा घटनांसाठी पनवेल महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

**नागरिकांना कळकळीचे आवाहन**

**"आपला जीव अमूल्य आहे. कृपया इमारतींची नियमित संरचनात्मक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करा. धोकादायक इमारती तात्काळ रिकाम्या करा आणि प्रशासनाला सहकार्य करा."**

आपत्कालीन परिस्थितीत पुढील दूरध्वनी/ Toll Free क्रमांकावर संपर्क साधावा.

दूरध्वनी क्रमांक :- ०२२-२७४५८०४०/४१/४२

Toll Free क्रमांक :- १८००-२२७-७०१

आयुक्त
पनवेल महानगरपालिका

पमपा/अ.बां.नि./२४२६/जा.क्र. / २०२६